# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. शि.वि./सशिअ./बांधकाम/931 /2014 दिनांक – 20/02/2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय :– सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधकामाबाबत.**
**संदर्भ :– मप्राशिप मुंबई यांचे पत्र क्र. मप्राशिप/सशिअ/बांध AWP&B/2013–14/579, दि. 14 फेब्रुवारी 2014.**

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन 2014–15 मंजूरी करिताची केंद्र शासनाच्या प्रकल्प मान्यता मंडळाची बैठक दि. 6 फेब्रुवारी 2014 रोजी नवी दिल्ली येथे घेण्यात आली. सदर बैठकीत बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 चे उल्लंघन होऊ नये या दृष्टीने बांधकामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने पुढील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

**1) नवीन प्राथमिक शाळा इमारत बांधकामे :–** सदरील बांधकाम जागा उपलब्ध नसल्यामुळे होऊ शकत नसल्यास जिल्हयातील इमारतविरहीत शाळेकरिता जागेच्या उपलब्धततेची पडताळणी करून हे बांधकाम करण्यात यावे व तसा तात्काळ प्रस्ताव सशिअ. कार्यालयास सादर करावा.

**2) वर्गखोली बांधकामे :–** प्रगतीपथावर असलेली सर्व बांधकामे माहे मे, 2014 अखेरपर्यंत पूर्ण करण्यात यावी. तसेच सुरू न झालेल्या वर्गखोली बांधकामाची प्रशासकीय मान्यता रद्द करून आवश्यकता असलेल्या शाळेसाठी सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरील बांधकाम ऑगस्ट, 2014 अखेरपर्यंत पूर्ण करण्यात यावे व तसा तात्काळ प्रस्ताव सशिअ. कार्यालयास सादर करावा.

**3) मुलां–मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, विद्युतीकरण :–** DISE DATA सन 2013–14 नुसार अद्यापी काही शाळांमध्ये या सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आपल्याकडून आपल्या शाळांमध्ये या सुविधा उपलब्ध असल्याचे प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र सशिअ. कार्यालयास सादर करावे. आपल्याकडून प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच ही बांधकामे समर्पित करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. सदरील कामे समर्पित केल्यानंतर पुनःश्च मंजूर होणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलिपी :– सविनय सादर**

1. मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर.
2. मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर

**प्रत उचित कार्यवाहीस्तव सादर**

3. मा. सहा. आयुक्त, .................................... झोन क्र. ..............., मनपा. नागपूर
4. कनिष्ठ अभियंता बांधकाम, ........................................ झोन क्र. ........, मनपा. नागपूर
5. लेखा अधिकारी (सशिअ.), म.न.पा. नागपूर.
6. सहा. कार्यक्रम अधिकारी (सशिअ.), म.न.पा. नागपूर.